# प्रकरण तिसरे

## पाध्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा

# प्रकरण तिसरे

## पाध्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा

### प्रास्ताविक:

ललित वाङ्.मय प्रकाराची विभागणी "कथानकप्रधान" आणि "व्यक्तिप्रधान" या दोन प्रकारात करण्याची पध्दत होती. लघुकथेचा आजवरचा विकास पाहिला तर तिचे सुरवातीचे स्वरूप कथानकाच्या गुंतागुंतीकडून व्यक्तिदर्शनाच्या सूक्ष्मतेकडे गेलेले स्पष्ट दिसते. नंतरच्या काळात कथानकापेक्षा व्यक्तिदर्शन महत्त्वाचे हा विचारही महत्त्वाचा मानला गेला. अलिकडे व्यक्तिदर्शनाचाही वेगळा वेगळा विचार न करता कथेतून व्यक्त होणा-या जीवनाच्या संपूर्ण अनुभवाच्या संदर्भातच व्यक्तिदर्शनाचा विचार केला जातो. व ते योग्यही वाटते.

भाऊ पाध्ये यांच्या कथेत येणा-या व्यक्तिरेखा ह्या रूढ मराठी कथेतील व्यक्तिरेखांपेक्षा सकृतदर्शनी वेगळया वाटतात. पाध्यांची कथा मानवी स्वभावाचे तसेच जीवनव्यवहाराचे वेगवेगळे पैलू आपल्याला दर्शविते. पाध्ये माणसाचे वर्तन चित्रित करताना, त्याचे गुण, अवगुण मानवी पातळीवर चित्रित करतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिचित्रणाला विविधांगी वैशिष्टयपूर्णता लाभते.

त्यांच्या सर्वच कथांमधून येणा-या व्यक्ती ह्या समाजातील विविध थरांतील आहेत. त्यांचे वर्तन नैसर्गिक, मानवी स्वभावानुसार आकारत गेलेले दिसते. पाध्ये व्यक्तिचित्रणाचा कथेच्या आशयाशी एकसंध आणि एकरूप असा सांधा जोडतात. कथेचा परिणाम त्यामुळे अधिक गडद होतो व कथा कलादृष्टया यशस्वी होते.

पाध्यांनी रंगवलेल्या व्यक्तिरेखा वास्तवातून उचललेल्या आणि वास्तवाशी अतूट संबंध दाखवणा-या अशा आहेत. त्यामुळे त्या

जीवन्त, हाडा-मांसाच्या जाणवतात.

अशा वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखा पाध्ये आपल्या कथेत निर्माण करतात. या व्यक्तींचे आपसातील संबंध, त्यांच्या जगण्यातील वेगळेपणा आणि या सगळ्याला जीवंतपणा आणणारी, मानवी स्वभावातील सूक्ष्म गुंतागुंत पकडणारी पाध्यांची वैशिष्टयपूर्ण शैली यांचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो.

या प्रकरणात आपल्याला पाध्यांच्या व्यक्तिचित्रणाचा विचार करावयाचा आहे. हा विचार अर्थातच कथेच्या आशयाच्या अनुरोधाने करावा लागतो. पाध्ये यांच्या कथेत मुंबई महानगरीत असणाऱ्या विविध थरातील जनजीवन येते. या विश्वात मानवी स्वभावाचे विविध नमुने, वृत्ती, प्रवृत्तींही वावरत असतात. या मानवी स्वभावांचे त्यांच्या वृत्ती प्रवृत्तीसह चित्रण पाध्ये आपल्या कथेत करतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखांतून विविधता दिसून येते. पाध्यांनी आपल्या कथेत निर्मिलेल्या वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना सोयीसाठी त्यांचे वर्गीकरण केलेले आहे.

पहिल्यांदा पाध्ये यांनी निर्मिलेल्या मुक्तपणे वावरणाऱ्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा विचारात घेतलेल्या आहेत. त्यानंतर दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेल्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा विचारात घेतलेल्या आहेत.

पाध्यांनी नपुसक पती प्राप्त स्त्रियांची व्यक्तिचित्रे जशी रेखाटलेली आहेत तशीच छळणारी मालकीणही शब्दातून जिवंत केलेली आहे. स्वकल्पनाधिष्ठित जीवन जगणाऱ्या पुरुष व्यक्तिरेखा ज्या सामर्थ्याने पाध्ये रंगवतात त्याच सामर्थ्याने विकृती बळावलेल्याप पुरुषांच्या व्यक्तिरेखा ते वाचकासमोर ठेवतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.
UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पाध्ये कलावन्त माणसांच्या व्यक्तिरेखा तपशीलासह चित्रित करताना दिसतात. तसेच राजकीय गुंड, कामगार यांच्या व्यक्तिरेखाही यथार्थपणे रंगवतात.

या सर्वच व्यक्तिरेखाची वैशिष्टये समग्रतेने येथे पहावयाची आहेत.

मुक्तपणे वावरणाऱ्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा:

पाध्ये यांची कथा विविध कारणांनी समकालीन व आधीच्या कथेपेक्षा वेगळी आहे. यातील एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची कथा एकसुरी व्यक्तिरेखांनी पछाडलेली नाही. वैविध्यपूर्ण व्यक्तिरेखा हे त्यांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट आहे.

पाध्ये यांना माणसाबद्दल प्रचंड आत्मीयता आहे. त्याच्या जगण्याला व्यावहारिकपणे व तटस्थेने स्वीकारण्याची मानसिकता त्यांच्याजवळ आहे. त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा सहज आणि नैसर्गिक वाटाव्यात अशा ते निर्माण करतात. यात त्याना परंपरा, रुढी, नैतिकता या गोष्टी अडसर वाटत नाहीत. जेव्हा वाटतील तेव्हा त्या गोष्टी बाजूस सारुन सहजजीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखा ते निर्माण करतात.

त्यांच्या बऱ्याच कथांतून त्यांनी मुक्तपणे वावरणाऱ्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा चित्रित केलेल्या आहेत. या स्त्रिया स्त्री-पुरुष संबंधाकडे व्यवहार म्हणून, निसर्गधर्म म्हणून पहातात. जगण्याचा अनुभव मोकळेपणाने घेणे त्या महत्त्वाच्या मानतात.
ह्या व्यक्तिरेखा तयार करणाऱ्या पाध्यांचा दृष्टिकोण हा व्यापक सहानुभाव असणारा मानवतावादी दृष्टिकोण आहे. त्यामुळेच ते अशा व्यक्तिरेखा चित्रित करु शकले. त्यांच्या आधीच्या कथाकारांना हे शक्य

झाले नाही. मुळात पाध्यांचा स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोणच विशाल मानवतावादी दृष्टिकोण आहे. त्यामुळेच ते अशा अप्रतिम व्यक्तिरेखा निर्माण करु शकले.

पाध्ये यांच्या "वसुंधरा" या कथेत येणारी "वसुंधारा" ही व्यक्तिरेखा या दृष्टीने महत्त्वाची आहे. वसुंधारेजवळ प्रचंड वैभव आहे. नवरा अफसर आहे. अशी वसुंधारा नाटकाच्या निमित्ताने रिसबूड या दिग्दर्शकाच्या जवळ जाते. त्याच्याकडून मुक्त लैंगिक सुख मिळवते. जे तिला घरात मिळत नव्हते. यात तिला आपण चूक करत आहोत असे वाटत नाही. उलट ती शृंगाराची नवनवी त-हा रिसबुडसमोर सादर करत असते.

जेव्हा तिला रिसबुडपासून दिवस जातात तेव्हा ती सहजपणे नाटकाच्या तालमी बंद करते. त्याच्याशी संबंध तोडते. तिला जी गोष्ट हवी होती ती मिळाल्यानंतर नाटक आणि रिसबुड या दोन्हीत तिला आस्था वाटत नाही. तेव्हा ती त्या सोडून देते.

तिच्या जगण्यात सहजता आहे. जी गोष्ट हवी ती मिळवावी हा निसर्गनियम तिला मान्य आहे. त्यामुळे ती रिसबुडकडून हवे ते मिळवते. यात तिला रुढ नैतिकतेचा अडसर वाटत नाही.

पाध्ये ही व्यक्तिरेखा अत्यंत ताकदीने उभी करतात. विविध तपशील - मग ते तिच्या शृंगाराचे असोत वा स्त्री-पुरुष संबंध सहज स्वीकारण्याचे असोत. कथेत या व्यक्तिरेखेला पोषक असे पसरवतात. घटना आणि तपशील यांच्या गुंफणीतून ही व्यक्तिरेखा अधिक गडद करतात. त्यामुळे ही व्यक्तिरेखा वाचकाच्या स्मरणात दीर्घकाळ रहाते.

अशीच दुसरी व्यक्तिरेखा म्हणजे "ठेच" कथेतील "अनुसयाबाई"

अनुसयाबाई•नानीभाईची पत्नी. समाजाच्या दृष्टीने बदफैली आहे. छिनाल आहे. पण निवेदक अप्पा तिच्या परिचयात आल्यानंतर हे सगळं खोटं असल्याची कबुली देतो व त्या घराशी घरोबा वाढवतो. अनुसयाबाईला मूल नाही ही खंत आहे. पण ती नानीभाईला लागलेली ठेच असे ती मानते. अचानक शिरडीत भारलेल्या अवस्थेत अप्पाशी संग करते. पण गावी आल्यानंतर त्याला जवळही येऊ देत नाही. आपण अप्पाशी संग केला ही फक्त त्याकेळची घटना॰ एवढाच तिच्या लेखी त्याचा अर्थ आहे. बाकी त्या घटनेचे तिच्यादृष्टीने महत्त्व शुन्य आहे.

या कथेची यशस्विताही फक्त अनुसयाबाई हया व्यक्तिरेखेची यशस्विता आहे. पाध्ये कथेत व्यक्तिरेखा चित्रित करत असताना आशयाशी तिला किती एकरूप करतात याचे चांगले उदाहरण म्हणजे ही व्यक्तिरेखा होय. अनुसयाबाईचे रूप, तिचा स्वभाव, तिचे वागणे या सा-याला शब्दरूप देता देता पाध्ये कथाआशय ही त्यातूनच मांडून टाकतात. ही त्यांची वैशिष्टय-पूर्ण शैली आहे.

त्यांच्या इतर कथेतील "बेबी", नॅन्सी, शैली या अशाच मुक्तपणे जगणा-या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा आहेत. ज्या पाध्यैच्या लेखन शैलीच्या महत्त्वाच्या वैशिष्टय बनलेल्या आहेत.

## सारांश:

पाध्ये स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण नैसर्गिक व्यवहार म्हणून करतात. ते त्यात गुंतत नाहीत. तसेच स्त्रियांच्या विविध व्यक्तिरेखाही ते तितक्यात तटस्थपणे व समर्थपणे चित्रित करतात. या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा घटना, प्रसंगातून ते जीवंत करतात. त्यांना मानवी वास्तव-रूप प्राप्त करून देतात. त्यामुळे हया व्यक्तिरेखा विशेष लक्षणीय ठरतात.

दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेल्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा:
===============================================

पाध्यांची कथा जीवनाची विविध क्षेत्रे कथाविषय म्हणून निवडते. विषयाचे वावडे पाध्यांच्या कथेला नाही. त्यामुळे जीवनाचे वेगवेगळे स्तर, मानवाच्या वेगवेगळया प्रवृत्ती, वर्ग या सगळयांना त्यांच्या कथेत स्थान आहे.

त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखा या ही वेगवेगळया थरातील, वर्गातील आहेत. वेगवेगळया प्रवृत्तींच्या आहेत. त्यांच्या कथेत स्त्रियांच्या विविध व्यक्तिरेखा सापडतात. त्यांचा वेगवेगळा विचार आपल्याला करावयाचा आहे.

या ठिकाणी आपल्याला दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेल्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा पाध्ये कशा चित्रित करतात हे पहावयाचे आहे.

पाध्ये यांची स्त्री-विश्वाकडे पहाण्याची दृष्टी स्वतंत्र आहे. सहानुभवाने ते स्त्रीकडे पहातात. तिचे वस्तूमूल्य त्यांना मान्य नाही. त्यामुळे ते आपल्या कथेतून स्त्रियांवर होणा-या अन्यायाचे ही चित्रण करतात. या चित्रणातूनच दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेल्या स्त्रियांची व्यक्तिचित्रे ते आकाराला आणतात.

"पोल्ट्री फार्मिंग" कथेतील "सुनंदा" हे याचे एक चांगले उदाहरण आहे. बाबीशेठ डिचोलकरांच्या घरात वाढलेली ही भाची आणखी कितीकाल पोसायची असा विचार करुन अंबादास टिपटोळकरच्या गळयात बांधली जाते.

मुळात ज्याला स्वत:लाच जगणे अवघड आहे असा अंबादास, सुनंदाबरोबर संसार करताना तिची कोणतीच हौस भागवू शकत नाही. आजारात तिला

औषधोही पुरवू शकत नाही. मात्र तिचा उपभोग हक्क समजून घेतो असतो. ती गरोदर राहिल्यानंतर लगेच बाबीशेठकडे तिची रवानगी करतो. पुन्हा आणण्याचे नावच घेत नाही. व्यवहारी बाबीशेठ त्याला शोधून पुन्हा तिला त्याच्याकडे पाठवतो. सुनंदा मुलासहीत त्याच्या घरी आल्यानंतर मूल औषधाविना मरते. वेश्येकडे जाणाऱ्या नवऱ्याविषयी तिला घृणा वाटू लागते. तीही तशीच खंगून मरते.
फक्त घटना आणि तपशील यांच्या माध्यमातून ही वाचकाला अस्वस्थ करणारी व्यक्तिरेखा ते चित्रित करतात. प्रत्येक घटना सुनंदावर कसा अन्याय होतो याचा तपशील देते. त्यामुळे सुनंदा ही अन्यायाने पिचून गेलेली मुलगी उध्वस्त होते. तिच्या जगण्यात फक्त सहन करणे एवढेच उरते. त्यामुळे ती वाचकाला अधिक विव्हळ करते.

"फाईव्ह गार्डन" मधील माई टुकरुळ ही अशीच दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेली स्त्री आहे. नोकरी सुटल्यामुळे नवराच तिला वेश्या व्यवसाय करावयास लावतो. गिऱ्हाईकं आणून देतो. तिच्या जीवावर ऐषआराम जगत असतो. पण त्याला तिनं कोणाशी जीव लावावा हे मान्य नाही. त्यामुळे तो सतत नवरेपणा तिच्यावर गाजवत असतो. अशी कचाटयात सापडलेली माई साधी मुलांची आठवणसुध्दा काढू शकत नाही. आपल्या जीवनाचे पदरही उलगडू शकत नाही. कारण जगायला तिला कसलातरी आधार हवा असतो.
ही व्यक्तिरेखा पाध्ये विविधांगी वैशिष्टयपूर्ण करतात. एक तडफडणारी आई म्हणून तिच्या स्वभावाचे कंगोरे कोळे आहेत. वेश्या म्हणून जगलेल्या जीवनाबाबत तिच्या म्हणून काही आठवणी आहेत. आणि कसा का असेना पण आबा हा आपला नवरा आहे. त्याला सांभाळले पाहिजे ही तिची एक धारणा आहे. त्यामुळे ही व्यक्तिरेखा वाचकाला अस्वस्थ तर करतेच

त्याबरोबरच वाचकाच्या मनात विविध प्रश्नही निर्माण करते. स्त्रीचे वस्तू मूल्य दाखवण्यास पाध्ये ही व्यक्तिरेखा समर्थपणे चित्रित करतात.

पारंपारिक विचाराच्या पुरूषाला आपली पत्नी म्हणजे आपल्या पायातील वहान वाटत असते. परंपरा याला आधार पुरवते. त्यामुळे बहुतेक परंपरावादी पुरूष स्त्रीला वहान समजूनच वागणूक देत असतात. अशा पुरूषांकडून स्त्रियांवर होणारे अन्याय हे विविध स्वरूपाचे असतात. अशा स्त्रियां विविधांगी यातना भोगत असतात. अशांचे प्रतिनिधीत्व करणारी "भामा" ही पाध्ये यांनी निर्मिलेली व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे.

"बायका खाणारी माणसे" अशी प्रसिध्दी असलेल्या बंडू अवदारेची भामा ही पत्नी. बापाला जड झाली. त्याने बंडूच्या गळयात बांधली. चाळीतल्या संसाराचे पहिले काही दिवस सुखाचे जातात. पण नंतर बायका खाण्याची परंपरा असणाराबंडू अवदाऱ्या भामाचा छळ करु लागतो. तिला रोज मारहाण होत असते. पण परंपरागत सोशिक स्त्रीसारखी ती सारेच सहन करत असते. चाळ तिच्या बाजूला असते. तिची चिंता करत असते. पण "हिरा" या स्त्रीच्या नादी लागलेला बंडू कोणालाच दाद देत नाही. उलट हिरालाच घरात आणून ठेवतो, जेव्हा चाळकरी तक्रार करतात तेव्हा "मी दुसरी बायको आहे" असे भामाकडूनच लिहून घेऊन तिची रवानगी पोलीस ठाण्यात करतो.

पाध्ये भामाला परंपरागत अन्यायाखाली दबणाऱ्या स्त्रीचे रुप भामाला देतात. पती हेच सर्वस्व मानून जगणारी भामा झालेल्या छळाला प्रत्युतर करत नाही . कारण तो परंपरेचा अवमान ठरला असता. चाळ पाठीशी असून ही ती लढू शकत नाही. कारण तिच्यात तेवढे धाडस नाही. नवऱ्याच्या माराच्या भीतीने आपण दुसरी पत्नी आहोत हे ती सहज कबूल

करते. या सा-या प्रसंगातून भामाचे सोशीकपण, तिचे हरवलेले व्यक्तिमत्व आणि उरलेले वस्तूमूल्य पाध्ये परिणामकारकपणे रेखाटतात. त्यामुळे ही व्यक्तिरेखा लक्षणीय ठरते.

भामाचे वस्तूमूल्य गडद करण्यासाठी तिने दुसरी बायको म्हणून सही करणे हा प्रसंग ते रेखाटतात. पाध्यांना कोणता प्रसंग, कोणता आशय गडद करण्यासाठी वापरावा याची विलक्षण जाण आहे. त्यामुळे एखादी व्यक्तिरेखा ते प्रसंगातून, संवादातून अविस्मरणीय करू शकतात.

"बगीच्या" कथेतील अनु, "गुदाम" कथेतील येसू आणि "मुरगी" कथेतील "पदी" या अशा स्वरूपाच्या व्यक्तिरेखा आहेत. या सगळ्याच स्त्रिया अन्यायाखाली दडपल्या गेलेल्या स्त्रिया आहेत. विविध प्रसंगातून, घटनातून आणि तपशीलाच्या सूक्ष्मतेतून पाध्ये यांनी या व्यक्तिरेखा परिणामकारकपणे उभ्या केलेल्या आहेत.

सारांश:
------

स्त्रियांवर होणा-या अन्यायाचे स्वरूप तटस्थपणे रेखाटण्यासाठी ते दुर्दैवाच्या कचाटयात सापडलेल्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा रेखाटतात. या व्यक्तिरेखा विविध घटनांतून परिणामकारक करण्याचा ते प्रयत्न करतात. तर विविध प्रसंगांचा वापर या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा जीवंत-करण्यासाठी करतात. त्यामुळे कथेचा आशय ह्या व्यक्तिरेखा गडद करतातच त्या बरोबरच हाडामासाच्या जीवंत व्यक्तिरेखा म्हणून ही त्या वाचकाला जवळच्या वाटतात. हे पाध्यांच्या लेखनशैलीचे यश होय.

नपुसक पती प्राप्त स्त्रियांची व्यक्तिचित्रे:

भाऊ पाध्ये यांनी आपल्या कथांतून स्त्रियांच्या विविध व्यक्तिरेखा चित्रित केलेल्या आहेत.

यातील नपुसक पती प्राप्त स्त्रियांच्या व्यक्तिरेखा सर्वस्वी भिन्न आणि वाङ्.मयीन दृष्टया महत्त्वाच्या आहेत.
पाध्यांचा स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोण सर्वस्वी भिन्न आहे. ते समाजवादी नैतिकता मानणारे लेखक असल्यामुळे स्त्रीचे माणूस म्हणून मूल्य त्यांना अधिक वाटते. त्यामुळे ते स्त्री-विश्वाकडे नैसर्गिक सहानुभावाने पहातात.
पाध्यांनी नपुसक पती प्राप्त स्त्रियांची व्यक्तिचित्रे रेखाटताना त्या स्त्रीला मन, भावना, इच्छा आहेत त्यांना नैसर्गिक जगण्याचा हक्क आहे हे मूळाशी धरून तटस्थपणे ह्या व्यक्तिरेखा रेखाटलेल्या आहेत.
यामुळे त्यांच्या या व्यक्तिरेखा रूढ मराठी कथेतील स्त्री-व्यक्तिरेखांपेक्षा सर्वस्वी वेगळ्या आहेत.

पाध्ये यांच्या "अक्करमाशा" कथेतील अन्याची आई ही व्यक्तिरेखा या दृष्टीने महत्त्वाची आहे. आपला नपुसक नवरा मृत्यूशय्येवर असताना ही बाई जसं वागते, जे बोलते त्या सर्वांतून तिचा नव-याविषयीचा तिटकारा वाचकाच्या समोर येतो. नव-याच्या मरणाबाबत तिने दु:ख दाखवावं, लोकांसाठी का असेना पण नाटक करावं अशी सगळ्यांची अपेक्षा. पण ती स्पष्ट सांगते. "मुळीच दाखवणार नाही .... मला हा काळ्या पसंत नसतानाही तुम्ही माझ्या गळयात बांधलात. बरं बाधलात ते बांधलात, पण तो मर्द आहे की नाही एवढं तरी पाहयचं होतं"[१] तिच्या वागण्यात, बोलण्यात स्पष्टपणा आहे.

ती तावडेशी विवाह-बाह्य संबंध ठेवते . यात तिला काहीच वावगं वाटत नाही. आपण आपली भूक शमवण्यासाठी तावडेजवळ गेलो यात तिला काही गैर वाटत नाही.
नवरा शेवटचे क्षण मोजत असताना ती गुलाबरोबर पत्ते खेळत असते. तो गेल्यानंतर पहिल्यांदा कॉफी करून घेते. मगच तो मेल्याचे जाहीर करते. या सगळ्या कृती तिची व्यक्तिरेखा सशक्त बनवतात. तिचा नव-याबद्दलचा राग व्यक्त करतात.

पाध्ये प्रत्येक शब्दाशब्दातून तिच्या व्यक्तित्वाला जीवन्त करण्याचा प्रयत्न करतात. तिच्या जगण्यातील ताण-तणावांचे दर्शन घडवतात. त्यामुळे अन्याची आई वाचकाला अस्वस्थ तर करतेच त्याबरोबरच वाचकाच्या मनात प्रश्न ही उभा करते.

अशीच व्यक्तिरेखा पाध्ये "नवरा" या कथेत "काकू"ची रंगवतात. काकूला आपला नवरा नपुसक आहे हे कळल्यानंतर ती आपल्या भावनांचा कोंडमारा न करून घेता आपल्याला मानवणारी अशी वाट शोधते. नरेंद्रशी संबंध ठेवते. पण हे तिचे विवाहबाह्य संबंध घराच्यांना मान्य होत नाहीत तेव्हा ती नव-यांचं नपुसकपण घरच्यांसाठी जाहीर करून टाकते. ती म्हणते "बिन बुडाचा माणूस माझ्या पदरात बांधालात आणि जन्मभर मी कुंवार राहू काय ?"[2] तिच्या जगण्याचा प्रश्न तिने सर्वांच्या समोर टाकल्यानंतर आपले नपुसकपण झाकण्यासाठी तिचा नवरा - काका - तिला दुसरीकडे घेऊन राहू लागतो. आणि तिने रमाकान्त दादाशी संबंध ठेवल्यावर त्याच्याशी दोस्ती करतो.
काकू आपलं जगणं आपल्या पध्दतीने सावरत असताना निवेदक मीला काकूचं विवाह-बाह्य वागणं म्हणजे काय ? हे कळू लागतं आणि काकू गमतीने

आपल्याला नवरा म्हणत होती म्हणजे खरोखरच काकूवर आपला हक्क आहे असं समजून तो काकूच्या अंगावर हात टाकतो. तेव्हा ती त्याला मारते आणि स्वत: रडू लागते. आपल्या नशीबी हे यावं याचं दु:ख ती आवरू शकत नाही. हा प्रसंग या कथेत चित्रित करून पाध्ये काकूच्या व्यक्तिरेखेला विविध कंगोरे प्राप्त करून देतात. यावरून पाध्ये प्रसंगांची रचना कथेच्या आशयाला गडदपणा आणण्यासाठी जशी करतात तशीच व्यक्तिरेखेची कलात्मक उंची वाढवण्यासाठीही करतात हे स्पष्ट होते. ही कथा नपुसक नवरा नशीबी आलेली स्त्री समाजात स्वत:ची वाट शोधू लागली तर अनैतिक ठरते. तिच्या वाटयाला वंचना येते पण तिला समजून घेणे कोणाला जमत नाही हे जसे दाखवते तसेच या व्यक्तीच्या मनात चाललेली विविध ताण-तणावांची घालमेल ही यशस्वीपणे दर्शित करते. त्यामुळे पाध्येची ही "काकू" एक अनोखी व्यक्तिरेखा ठरते.

"पडदा" कथेतील मैमुना ही अशीच बाकरमिया या बिनकामाच्या माणसाच्या हाती सापडते व तिच्या जगण्याला उध्वस्ततेचे रूप येते. बाकरमिया पडदा पाळणारा, खूपच बंधनात स्त्रीला ठेवणारा पुढारी पण तुरुंगातून जाऊन आल्यानंतर तिच्याच जीवावर जगू लागतो. तिने नात्यातल्या पोराशी संबंध ठेवल्यावर काहीही बोलू शकत नाही. या ठिकाणी मैमुना आपले शरीरधर्म निसर्गक्रमाने पुरे करण्यासाठी जी वाट चोखाळते ती तिला अव्यवहार्य वाटत नाही. पण समाज मात्र तिला जगू देत नाही.

पाध्ये या कथेत प्रसंगांच्या, ~~घटनांच्या साह्याने मैमुनाचे व्यक्तिचित्र~~ घटनांच्या साहयाने मैमुनाचे व्यक्तिचित्र जीवंत करतात. विविध तपशीलांच्या माध्यमातून ती व्यक्तिरेखा वास्तव करतात.

सारांश:

सारांश:

पाध्ये अशा स्त्रियांच्या व्यक्तिरेखा हया रुढ नैतिक भूमिका बाजूस सारुन रेखाटतात. त्यांच्या जगण्याचा अन्वय नैसर्गिक व्यवहार ध्यानात घेऊन लावण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे हया व्यक्तिरेखा कलात्मक होतात.

छळणारी मालकीण:

पाध्ये विविध स्वभावाची माणसे आपल्या कथांतून जीवन्त करतात. त्यांच्या वृत्ती-प्रवृत्तींवर, त्यांच्या स्वभावावर ते प्रकाश टाकतात. त्यामुळे पाध्यांच्या व्यक्तिरेखा सर्वांग माणूस समजून घ्यायला खूपच उपयोगी पडतात.

पण अशा व्यक्तिरेखा पाध्ये आपण अमुक एक प्रवृत्ती वाचकांच्या समोर ठेवायची म्हणून निर्माण करत नाहीत तर ती व्यक्तिरेखा आकार घेत असताना सहजपणे ती प्रवृत्ती-वृत्ती वाचकांसमोर येते. त्यामुळे पाध्यांच्या बहुतेक व्यक्तिरेखा अकृत्रिम होतात. सजीव आणि वास्तव होतात.

"अनु/भव" या कथेतील सुधाकाकू ही व्यक्तिरेखा पाध्ये एक प्रवृत्ती म्हणून उभी करतात.
सुधाकाकू प्रचंड श्रीमंत आहेत. अत्यंत चांगल्या 'हाय' सोसायटीत त्या रहात असतात. त्यांच्या घरात त्या आपल्या गावाकडून "अनु" या गरीब घरच्या मुलीला मोलकरीन म्हणून आणतात.
मोठा पगाळा असणाऱ्या या घरात प्रचंड कामाचा रगाडा अनुवर पडत असतो. पण सुधाकाकू तिला जराही उसंत देत नसतात. कथेचा निवेदक म्हणतो- "नोकराला कसं वागवायला हवं, किंवा असंही म्हणता येईल,

कसं वागवायला नको, याचे धडे सुधाकाकूकडून घ्यावेत. त्याचं एक तत्व आहे ही माणसं डोक्यावर चढू देता कामा नयेत. म्हणून त्यांना चांगलं दाबून ठेवले पाहिजे."[३]

आपण श्रीमंत आहोत म्हणजे गरीबाचा आपण छळच केला पाहिजे. हे त्यांच्या मनात बसलेले आहे. त्यामुळे त्या अनुचा सातत्याने छळ करत असतात. अनु गरिबीमुळे हे सारे मुकाटपणे सहन करत असते. कामाचा रगाडा उपसत असते. बोलणी सहन करत असते. पण ही अनु एक दिवस सुधा काकूच्या घरातून गायब होते. आपल्या त्रासामुळे अनु गायब झाली हे मान्य करायला सुधाकाकू तयार होत नाहीत. उलट तिची चाल बदलली, तिला कोणीतरी फसवलं असं फसवं समर्थन त्या तयार ठेवतात. लोकांपासून ही बातमी चोरण्याचा प्रयत्न करतात. म्हणजे श्रीमंतानी कोणताच दोष स्वत:कडे घ्यायचा नसतो, हे त्यांच्या मनाने पक्के घोतलेले आहे.

ही अनु एका मुसलमानाच्या, रहिमतखाँच्या घरी सापडते. ती सुधाकाकूकडे यावयास लागू नये म्हणून रहिमत चाच्याशी लग्न करते. तेव्हा सुधाकाकू मुसलमान किती वाईट असतात. "ते आपलं वय ..! मुलीचं वय...! काही पहात नाहीत. फक्त त्यांना वासना.... वासना. मुलीला मुळी ते माणूस समजतच नाहीत. उपभोगाची वस्तू समजतात. पशुसारखे वागतात हे मुसलमान पुरुष"[४] असे सांगत असतात. या सगळ्यात आपण अनुचा छळ केला हे मात्र त्या सोईस्कर विसरतात.

पाध्ये ही व्यक्तिरेखा अत्यंत तटस्थपणे आणि सूक्ष्म तपशीलाने जीवंत करतात. मुसलमान क्रूर, लंपट असा समज वापरून खरा निंद्य प्रकार बाजूस टाकण्याची प्रवृत्ती नेमकेपणाने सुधाकाकूच्या माध्यमातून चित्रित करतात. त्यामुळे ही व्यक्तिरेखा अनेक कारणांनी महत्त्वाची ठरते. पाध्यांच्या लेखनातील स्पृहणीयता ही या कथेतून प्रत्ययाला येते.

सुधाकाकू ही व्यक्तिरेखा पाध्यांच्या व्यक्तिरेखा चित्रणातील वेगळेपणा तर दाखवतेच, त्याबरोबरच त्यांची व्यापक सहानुभाव असणारी मानवतावादी भूमिकाही वाचकांच्यासमोर ठेवते.

स्वकल्पनाधिष्ठित जीवन जगणाऱ्या पुरुष व्यक्तिरेखा:

पाध्ये आपल्या कथांमधून पुरुषांच्या विविध व्यक्तिरेखा चित्रित करतात.
यातील काही पुरुष स्वत:च्या कल्पनेने स्वत:चे आयुष्य जगण्याचा प्रयत्न करणारे आहेत. त्यांना जगण्यातील सच्चेपणा, अंत:प्रेरणा आणि स्वातंत्र्य महत्त्वाचे वाटते. पाध्ये अशा व्यक्तिरेखा कोणताही अभिनवेश न बाळगता सहजगत्या निर्माण करतात व जगण्याचा एक नवाविचार या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून अकृत्रिमपणे वाचकांच्या समोर ठेवतात.

याचे प्रत्यंतर आपल्याला "कुटुंब" कथेतील "निवेदक-मी"च्या व्यक्तिरेखेतून मिळते. हा मी स्वत:च्या कल्पनेने आयुष्य जगण्याचा प्रयत्न करतो. हा निवेदक-मी डॉक्टर आहे. प्रचंड पैसा आहे. त्याला दोन मुलं आहेत. त्याचं एक कुटुंब आहे. पण त्याचा कुटुंबपध्दतीवर विश्वास नाही. तो म्हणतो- "मला आपल्या कुटुंब व्यवस्थेबद्दल चीड आहे. संताप आहे. या देशाचे, या समाजाचे वाटोळे तर आपल्या कुटुंबव्यवस्थेमुळेच होते."[५] या त्याच्या विचारांमुळे तो मुलगी एकवीस वर्षांची होताच घरातल्या सर्वांना पार्टी देऊन कौटुंबिक जबाबदारीतून मुक्त होतो. मुलगा चहा-भजी सेंटर काढतो. यात त्याला कोणतीच अप्रतिष्ठा वाटत नाही. तो त्याला परवानगी देतो. पत्नीनं दुसरा नवरा केला तरी त्याचं काही म्हणणं नाही. इतका तो स्वतंत्र विचारवादी आहे. स्वत:च्या कल्पनेनुसार जगणारा आहे. त्याच्या जगण्यात सच्चेपणा आहे.

पण त्याची फिल्मी पत्रकार असणारी मुलगी नीता गोस्वामी या गृहास्थासमोर स्वातंत्र्य हरवून बसते हे त्याला मान्य नाही. स्वातंत्र्यानंतर माणसाने गुलाम होणे त्याला मानवत नाही. पण त्याच्यासमोर नीतानेही गुलामी स्वीकारलेली आहे. त्यामुळे तो अस्वस्थ होतो. अशातच नीता गोस्वामीपासून गरोदर होऊन परत फिरते. तो स्वत: डॉक्टर असल्याने त्याच्या पत्नीच्या मते त्याने गर्भपात करावा असे असते. पण तो म्हणतो --"आता तिचा गर्भ पाडून का तिला उजळ माथ्याने फिरता येणार ? तो निलाजरेपणा ठरला असता."[६] त्याला अशा खोटया प्रतिष्टेची उबग आहे. त्यामुळे तो तसं काहीही करत नाही. उलट नीताने त्या मुलास जन्म द्यावा. वाढवावं असं त्याचं मत आहे. पण नीताला तिच्या भावाकडून मार खावा लागतो व ती आत्महत्या करते. यात या निवेदक काहीच करु शकत नाही.

स्वत:च्या कल्पनेनुसार जगणारा निवेदक हा विविधांगी परिणामकारक विचारांमुळे वाचकाच्यासमोर जिवंत होतो. त्याच्या जगण्यातील सच्चेपणा, स्वातंत्र्याच्या त्याच्या कल्पना या साऱ्यातूनच तो वेगळा वाटतो. पण मुलांना स्वातंत्र्य द्यावे की न द्यावे ही संभ्रवस्था निवेदक टालवू शकत नाही. पाध्ये ही व्यक्तिरेखा एक आव्हान समजून उभी करतात व वाचकाच्या मनात प्रश्न शृंखला निर्माण करतात.

बारीकसारीक तपशील देऊन या निवेदकाची मानसिक घडण कशी आहे. त्याच्या कृतीतील सच्चेपणा कसा आहे याचे प्रत्यंतर पाध्ये वाचकांना देतात. तसेच प्रसंगातून विचाराशी प्रामाणिक राहूनही व्यक्तिरेखा लक्षणीय करतात.

मुक्त लैंगिक जीवनाचा पुरस्कार करणारारिसबुड आपल्याला "वसुंधरा" कथेत सापडतो. नाटकाचे दिग्दर्शन करणारा रिसबुड वसुंधरेला पाहिल्यानंतर म्हणतो - "मग आम्ही आमचे पौरुषत्व सिध्द करण्यासाठी सरसावलो"[७]

यात त्याला काहीही गैर वाटत नाही. उलट आपली व्यवस्था विवाहित पुरूषाची गणना नपुसकात करत असते याचा त्याला राग आहे. तो म्हणतो "आपण विवाहित पुरूष - संसार करून, दोन-दोन पोरांना जन्म देऊन नपुसकच झालेलो असतो. आपले पौरूषत्व आपल्या बायकोलाच काय ते माहित असते. बाकीच्या बायकांनी आपली केव्हाच "सेफ" म्हणून गणना केलेली असते"[८] हे त्याला मान्य नाही. त्यामुळे तो वसुंधरेकडे सरसावतो. तिला काहीच अभिनय येत नसताना नाटकात घेतो. लोक काय म्हणतील याची त्याला चिंता नाही. उलट तो म्हणतो -- "जर मला जे पाहिजे ते मिळत होतं तर मग मी इतरांची पर्वा का करावी ? माझा त्यांच्या "स्टेनलेस स्टील" नीतीवादावर विश्वास नाही."[९]

तो तिच्याशी मुक्तपणे संग करतो. त्याच्यापासून तिला दिवस जातात. दरम्यान त्याची पत्नी म्हणते की तुम्ही माझा केसाने गळा कापलात. त्यावेळी तो लग्न संस्थेबद्दल बोलून जातो. म्हणतो -"प्रत्येक बाई पुरूषाकडे गळा कापण्यासाठी एक केस आहे असं म्हणत आली आहे. आमची सौ. ही त्यातली एक स्त्री. सनातनी स्त्री, जुनाट विचारांची स्त्री, नवऱ्यावर हक्क सांगणारी स्त्री, आपण लग्न करून एखादीला सौ. करून घेतो, त्यावेळी अशा एका स्त्रीच्या हातात आपले दावणे देऊन बसतो."[१०] असे दावणे होऊन बसणे त्याला मान्य नाही. त्यामुळे तो मुक्त जीवन जगू शकतो.

पाध्ये या रिसबुडचा मुक्त स्वभाव अत्यंत नेमक्या शब्दात वाचकांसमोर उभा करतात. घटनांच्या माध्यमातून त्याच्या स्वभावाची वैशिष्टये दाखवतात. व ही व्यक्तिरेखा वास्तव व जीवंत करतात. यात मुक्तपणा आहे पण स्वैरता नाही. अमुकवेळी असं वागावेसे वाटणे आणि तसे जगणे हे रिसबुडला जमते. कारण त्यांनी रूढ नैतिकता बाजूस सारली आहे. ही

त्यांची व्यक्तिमत्व रेखाटण्याची शैली व भूमिका मराठी कथेस सर्वस्वी नवीन अशीच आहे.

अशा स्वभावाच्याच व्यक्तिरेखा ते "ठेच", "पासवर्ड" या कथेत अप्पा व डोंगरकेरी यांच्या रेखाटतात.

सारांश:

पाध्ये स्वत:च्या कल्पनेनुसार जगणाऱ्या पुरुषांच्या व्यक्तिरेखा अत्यंत परिणामकारक पध्दतीने रंगवतात. या व्यक्तिरेखा संवाद, प्रसंग व घटना यांच्यातून जीवंत करतात.

जगण्याचा नवा विचार मांडणाऱ्या या व्यक्तिरेखा वाचकाला झपाटून टाकतात. हेच पाध्यांचे यश होय. हे झपाटलेपण या व्यक्तिरेखांच्या जगण्यातून, विचारातून उभे करण्यात पाध्ये यशस्वी झालेले आहेत.

विकृती बळावलेल्या पुरुषांच्या व्यक्तिरेखा:

भाऊ पाध्ये आपल्या कथालेखनातून मानवी व्यक्तित्वाचा तळ गाठण्याचा प्रयत्न करतात. माणसाच्या वर्तनाचे नीट आकलन वाचकां-समोर ठेवण्याचा प्रयत्न करतात. पाध्ये माणसाकडे आत्मीयतेने, समाजवादी भूमिकेने पहातात. त्यामुळे ते एखादया वृत्तीचा अथवा प्रवृत्तीचा पक्ष घेत नाहीत. पक्षाकाराच्या भूमिकेतून ते आपल्या कथेमध्ये व्यक्तिरेखा चित्रित करत नाहीत. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखांना सर्वात्मकता लाभते. याला दुसरे एक कारण म्हणजे ते व्यक्तिरेखा तटस्थपणे प्रेक्षकाच्या भूमिकेतून उभी करतात. त्यामुळे एखादी मानवी विकृतीचा यथासांग तळ ते गाठू शकतात. ही विकृती सहजपणे वाचकांच्यासमोर ठेवू शकतात.

त्यांच्या "मुरगी" कथेतील "केरु गाबत्या" ही व्यक्तिरेखा अशाच एका विकृत पुरुषाची व्यक्तिरेखा आहे. केरु गाबत्या मांजरी हेलकरी समाजातील हमाल. पण राज्य लॉटरीच्या पुण्याईने त्याच्याकडे पैसा येतो आणि त्याचे जीवन बदलते. पैशामुळे त्याच्याकडे प्रतिष्ठा येते. पैशामुळेच त्याच्यातील वासना बळावते. तो म्हणतो-- "मला चार चाकर आहे, पैसा आहे, आराम आहे.... आपलं नाव चालवायला पाहिजे. वंश वाढवायला पाहिजे."[११] वास्तविक तो स्वत: नामर्द, नपुसक होत चाल-लेला आहे याची त्याला कल्पना आहे. तरी ही पैशाच्या वैभवामुळे त्याच्यात भोगलालसा निर्माण होते.

केरु गाबत्या शिरनाळयाच्या पदीला हस्तगत करण्यासाठी सापळा रचतो व त्यात यशस्वी होतो. पण पदीशी संग करण्यात तो पहिल्याच रात्री अपयशी होतो. हा केरु गाबत्या आपल्यातील नपुसकपण फक्त पैशामुळं मान्य करत नाही. त्याच्यातील हावरटपणा त्याला अधिकच हावरट बनवत असतो. पैसा असणं ही त्याची पौरुषात्वाची कल्पना आहे. पाध्ये हे त्याच्या स्वभावाचे बारकावे तपशीलांसह रेखाटताता व केरुची व्यक्तिरेखा जीवंत करतात.

केरु गाबत्या मुरगी खात असताना त्याची होणारी ओंगळ अवस्था, गळणारी लाळ, हावरटपणा आणि मेलेली मुरगी खाण्यातील त्याची पौरुषात्वाची कल्पना या सा-याचेच अत्यंत प्रत्ययकारी चित्राण पाध्ये करतात. त्यामुळे केरु गाबत्या ही एक हाडा-मासाची व्यक्तीम्हणून वाचकासमोर येते.

पाध्ये ही व्यक्ती-रेखा चित्रित करत असताना प्रत्येक प्रसंग तार्किक चौकटीचा अवलंब करुन रंगवतात. कुलाब्याच्या रांडेजवळ हतबल ठरलेला केरु, त्यानंतर वेश्येकडे जाण्यास घाबरणारा केरु, नंतर पौरुषात्व समाजमान्य करुन

घेण्यासाठी पदीशी लग्न करणारा केरु व नंतर ते ही साध्या न झाल्याने पदीला मृत करुन उपभोग घेण्याचा प्रयत्न करणारा केरु हे सारेच प्रसंग या व्यक्तिरेखेचे विविध पैलू वाचकांसमोर ठेवण्यासाठी येतात. त्यामुळे पाध्ये एखादी व्यक्तिरेखा गडद करण्यासाठी प्रसंगाचा उपयोग कसा करुन घेतात याचे प्रत्यंतर येते.

केरुने पदीचा खून केल्यानंतर त्याच्या कमरेखाली जान येते. त्याला मुरगी आणि पोरगी सारखीच वाटते. मृत गोष्ट भोगण्याचा मुर्दाडपणा पोसणारा केरु पाध्ये अत्यंत ताकदीने रंगवतात. त्यामुळे तो त्या कथेच्या आशयाशी एकरुप होतो. ही व्यक्ति रेखा जीवंत करण्यासाठी पाध्ये शिरनाळ्या, आबा, अनुसयाबाई याही व्यक्तिरेखांचा उपयोग करतात. त्यामुळे केरु गाबत्याची व्यक्तिरेखा अधिक उठावदार व अविस्मरणीय होते.

पाध्ये केरु गाबत्याची व्यक्तिरेखा जशी यशस्वी करतात तशीच "फाईव्ह गार्डन" कथेतील "आबा टुकरूळ" हया हतबल, विकृत पुरुषाची व्यक्तिरेखाही जीवंत व्यक्तिरेखा करतात.

आबा टुकरूळ कधी काळचा म्युनसिपालटीतला क्लार्क. लाच खाताना नोकरी गमावून बसतो आणि बायकोला वेश्या करुन तिच्या भाडपणावर जगण्याची धडपड करतो. उतारवयात त्याच्या जीवनाचे पदर पत्नीसमोर उलघाडताना त्याची व्यक्तिरेखा डोळ्यासमोर येते.

आबा टुकरूळला आपली पत्नी वेश्या आहे याचे कधीही वाईट वाटत नसते. उलट तो तिला गि-हाईक मिळवून देत असतो. तिला वेश्या म्हणून पकडल्यानंतर तो आपण अब्रुदार असल्याचा दावा मिरवतो. हाच आबा माई टुकरूळला अनेक पुढा-यांशी संग करने भाग पाडत असतो. या सगळ्यात त्याची जगण्याची केविलवाणी धडपड चाललेली आहे. पण तोच आबा

जेव्हा पत्नी जवानाशी जीव लावून संग करते तेव्हा चिडतो. कारण त्याच्यातला "नवरा" जागा होतो. तिच्या आधारावर आपण जगतोय ही भावना त्याला जागृत करते.

पत्नीचा उल्लेख तो "रांड" असा करतो. मात्र तिने त्याला डिवचलेले खपत नाही. आपला पराभव मान्य करणे त्याच्यातील पुरुषाला जमत नाही. शेवटी माई टुकरूच्या हाताने मरतानाही तो आक्रंत करत नाही. विविध ताण-तणावांचा वापर करुन हतबल पुरुषाचे, विकृत पुरुषाचे वास्तव व्यक्तित्व पाध्ये आबा टुकरूला देतात. त्यामुळे ही व्यक्तिरेखा तिरस्कारासाठी का असेना पण वाचकांच्या मनाला व्यापुन टाकते.

पाध्ये ही व्यक्तिरेखा उभी करत असताना संवाद आणि ताण-तणाव यांचा बेमालूम उपयोग करतात. अशी व्यक्तिरेखा कथेच्या इतिहासातही दुर्मिळ ठरावी, इतकी यशस्वी आणि कलात्मक ही व्यक्तिरेखा आहे.

सारांश:

पाध्ये जीवन विश्वातील एकसूरी व्यक्तिरेखाची निर्मिती न करता वैविध्यपूर्ण व्यक्तिरेखा रेखाटतात.
माणसात बळावत जाणारी विकृती, त्यामुळे व्यक्तीचा बदलत जाणारा स्वभाव आणि त्याचे इतरांशी असणारे वर्तन पाध्ये तपशीलाने जीवंत करतात.

या ठिकाणी पाध्ये नवकथेच्याही पुढे गेलेले आपल्याला दिसतात. गाडगीळ एखादी विकृती दाखवताना लेखकाचा पक्ष निश्चित करतात व विकृतीवर तुटून पडतात. पण पाध्ये "आहे हे असं" या पवित्र्याने व्यक्तिरेखा अधिक कलात्मक करतात.

क्लावन्तांच्या व्यक्तिरेखा:

पाध्ये यांच्या कथांतील व्यक्तिरेखा आशय गडद करतात. त्यामुळे त्यांच्या कथा अधिक परिणामकारक होतात. याचे चांगले उदाहरण म्हणजे त्यांनी रंगवलेल्या कलावन्त व्यक्तिरेखा.

त्यांच्या "सांड" कथेतील गजा मारळकर नेहमीच सांडाचे चित्र काढतो. त्या चित्रांमुळे तो ख्यातनाम चित्राकार होतो. पण हे चित्र काढणेही त्याची मानसिक गरज आहे. तो म्हणतो - "हा सांड रंगवताना मला आनंद होत नाही. हा रंगवताना माझ्या रक्ताची सळसळ मला जाणवते. कानशिले तापतात. मस्तक भणभणू लागते. अक्षरश: मला वेड लागते. एकदा का हा सांड रंगवून झाला की मी कुठेतरी म्हणजे फरशीवर निपचित पडतो. विलक्षण थकलेला असतो. मी-माझ्या सर्वांगातील त्राण नाहीसे झालेले असते. शरीर म्हणजे एक फुसका बार वाटू लागतो"[१२] त्याला असे वाटते- याचे कारण त्याच्या मानसिकतेत आहे. लहानपणी कधीकाळी मनात रुतलेला सांड आणि त्याच्या आईचा त्याच्या काकाशी व इतरांशी असणारा अनैतिक संबंध त्याच्या मनावर परिणाम करुन गेलेला आहे. त्याचं आणि त्याच्या आईचं कोणतं नातंच त्यानं राखलेलं नाही. यालाही कारण हेच आहे.

संपूर्ण कथेत गजा मारळकर ही व्यक्तिरेखाच वाचकाला झपाटून टाकते. गजाचा हा सांड, त्याच्या पाठीमागची ही वातावरण निर्मितीसाठी येणारी कथा या साऱ्यामुळे गजा मारळकर ही व्यक्तिरेखा वाचकाच्या मनात अनंत प्रश्न निर्माण करते. मालतीचे गरीब गाय_पण आणि गजामध्ये असणारा सहानुभाव यामुळे मालतीच्या पतीमध्ये असणारे सांडपण वाचकाला अस्वस्थ करुन जाते. कारण हे सांडपण गजाच्या मनातल्या सांडाशी निगडीत आहे. गजा मारळकर या व्यक्तिरेखेच्या ठसठसीतपणा मुळे "सांड" या कथेचा आशय अधिक गडद होतो. कथेच्या परिणामकारकतेचे श्रेय "गजाच्या व्यक्तिरेखेकडे जाते.

कलावंताचा कलंदरपणा, त्याच्या जगण्यातील वेगळेपण या सा-याच्या तपशीलांचा वापर पाध्ये "राजा मास्कर" या कलावन्ताची व्यक्तिरेखा उभी करण्यासाठी करतात. त्यांनी शब्दबध्द केलेल्या तपशीलांमुळे ही व्यक्तिरेखा अधिक उठावदार होते.

माणसातील चांगलेपणाला पाध्ये अधिक महत्त्व देतात. चांगुलपणा हा त्यांच्या व्यक्तिरेखांच्यामध्ये महत्त्वाचा मानून ते व्यक्तिरेखा रेखाटतात. याचा प्रत्यय आपल्या "बेसूरा" या त्यांच्या कथेमध्ये येतो. या कथेचा नायक भास्कर तिळवे हा संगीतावर मनस्वी प्रेमकरणारारा भणंग कलावन्त आहे. आपल्या कलासाधनेत त्याला कोणाचाच अडथळा वाटत नाही. रहदारीच्या रस्त्यात, लोकलच्या खाचाखाच गर्दीत त्याची कलासाधना चालू असते. लोकांच्या दृष्टीने वेडा ठरलेला भास्कर तिळवे कुंदा शशिनकरची आई प्रसिध्द गायिका माई राशिनकर यांच्या ऑपरेशनसाठी स्वत:ची खोली विकून टाकतो.

त्याच्या भसाड्या आवाजानं हैराण होणारी कुंदा अथवा संपूर्ण समाज हा त्याच्या अंत:करणातील चांगलेपणा ओळखू शकत नाहीत. त्याच्या मनाचा विचार करत नाहीत. पण हाच भास्कर तिळवे मात्र अडचणीत सापडलेल्या माई राशिनकरना कशाचाच विचार न करता वाचवतो. त्याच्यातील व्यापक सहानुभाव पाध्यांनी या कथेत अधिक दमदारपणे चित्रित केलेला आहे. त्यामुळे भास्कर तिळवे वाचकाच्या मनात घर करून रहातो. पाध्यांची "बेसुरा" ही कथा फक्त भास्कर तिळवे याच्या व्यक्तित्वामुळे अधिक वाचनीय होते. यशस्वी होते.

पाध्ये आपल्या प्रत्येक कथेतील व्यक्तिरेखा त्या कथेतील घटनांशी, आशयाशी एकरूप करतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखा लक्षणीय ठरतात.

जी व्यक्तिरेखा चित्रित करावयाची आहे तिच्या व्यक्तिमत्वाचे सर्व पैलू अधिक रेखीवपणे पाध्ये चित्रित करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या "थिएटर" कथेत येणाऱ्या विकास, बाबा वाळक्या आणि सुहासिनीबाई या तीनही व्यक्तिरेखा कलेला जीवन मानणाऱ्या, कलेत हरवून जाणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत. पण त्यांचे जगण्याचे स्वत:चे असे तत्वज्ञान आहे. ते जगत असताना विविध मुड राबवत असतात. त्यामुळे त्यांच्या जगण्याच्या पध्दतीही वेगवेगळ्या आहेत.

विकास हा अभिनयामध्ये मुरब्बी आसणारा कुशल नट आहे. त्याला नाटक महत्त्वाचे वाटते. पण त्याही पेक्षा कुणाच्यातरी "वाटण्याने" आपल्या जीवनात आपल्याला हवी असणारी गोष्ट सोडावी लागावी हे त्याच्या कलावन्त मनाला मान्य नाही. त्यामुळेच "रेवाशी लग्न कर" म्हटल्यानंतर त्याला नाटकच नकोसे वाटू लागते. तो बेवडा ठोकून हिंडू लागतो. त्याचा बाप बाबा वाळक्या असाच अभिनयात वाकबगार असणारा माणूस पण सुहासिनीबाईशी लग्न न करता आल्यामुळे बेवडा ठोकून आयुष्य घालवत असतो. सुहासिनीबाई हाडाची कलावन्त. पण कलावन्ताच्या कलंदरपणाला घाबरून "स्थिर आयुष्या"च्या संकल्पनेनं झपाटली. पैसा, प्रतिष्ठा मिळवता आली. पण कलावन्त म्हणून जगता आलेलं नाही. या सगळयांच्यामध्ये वावरणारी रेखा जी उत्तम नटी आहे. पण तिला भावना सांभाळता आल्या नाहीत.

या चौघांच्या आयुष्याची एकमेकात सरमिसळ करून पाध्ये कलावन्ताच्या जीवनाचे एक अप्रतिम रसायन घडवतात. कलावन्ताच्या जगण्याची विविध वैशिष्टये या चौघांच्या जगण्यातून शब्दबध्द करतात. आणि एकसंघ कलावन्तीयपण उभे करतात. त्यामुळे "थिएटर" हे एक कलावन्ताचे सरस

व्यक्तिचित्र बनते. एकूण कथेचा आशय आणि कथेतील व्यक्तिरेखा ह्या बाजूलाच काढता येत नाहीत. इतक्या त्या एकमेकात बेमालूम मिसळलेल्या आहेत. व्यक्तिरेखा चित्रित करत असताना आशय त्या व्यक्तिरेखेत पूर्णपणे एकरूप करणे ही पाध्यांची शैली मराठी कथेत पूर्णत: नवखी आणि स्वत:चा ठसा उमठवणारी आहे. हे निश्चित.

"थालीपीठ" कथेतील "मधु" या कादंबरीकाराची व्यक्तिरेखा ही अशीच आहे. ज्याला खोटया प्रतिष्टेची उबग आहे. हाय सोसायटीच्या कृत्रिम जीवनाचा ज्याला तिटकारा आहे असा मधू म्हणतो — "मला भीती वाटते इंटलेक्युअल मंडळींची• त्यांच्याशी संबंध आला की, आपली तीन मुद्दयांवर गोची होते - एक गुडरीडिंग, गुड टॉकिंग, आणि गुड इटिंग"[१३] ही माणसं खोटया प्रतिष्टेसाठी हे सारं करत असतात. नीना सरवटे ही त्यातीलच एक. जिचा घटस्फोट झालेला आहे. जिला आपलं उफाळणारं शरीर आवरणं कठीण आहे. पण तरीही हाय सोसायटीच्या नावाखाली तिचं स्वत:च गुदमरणं ती सांभाळते. मधु या कलावन्ताला हेच मान्य नाही. माणसाने नैसर्गिकपणे जगावं असं मधुला वाटतं. त्यामुळे तो सरळ नीना सरवटेच्या चुंबनाची अपेक्षा तिच्या समोरच व्यक्त करतो. या प्रसंगातून पाध्ये एकाचा नैसर्गिकपणा आणि दुसऱ्याचा कृत्रिमपणा अत्यंत सहज पण परिणामकारकपणे वाचकासमोर ठेवतात. त्यामुळे घटनांचा वापर व्यक्तिरेखा गडद करण्यासाठी पाध्ये कसा करतात याचा प्रत्यय येतो.

कलावन्त हा आपल्या कोषात जगत असला तरी माणसातील माणूसपणावर त्याचे प्रचंड प्रेम असते. त्यासाठी तो आपल्या व्यक्तित्वाला कधी कधी बदलायलाही तयार असतो. याचे चित्रण पाध्ये "स्व.देशभक्त काका" या कथेतील कवीच्या व्यक्तिरेखेतून करतात. आणि कलावन्ताची आणखी एक समर्थ व यशस्वी व्यक्तिरेखा रेखाटतात.

या कथेतील कवी हा फक्त चर्चेसाठी स्व. देशभक्त काकांजवळ येत असतो. काकांच्या जीवनातील चढउतारात तो त्यांच्याशी चर्चा करण्याचे कर्तव्य इमाने इतबारे पार पाडतो. यात त्याचा कोणताच स्वार्थ नसतो. अथवा उदात्त भूमिकाही नसते. फक्त काकांना बरं वाटतं, आपल्याला बरं वाटतं म्हणून तो चर्चा करत असतो. आयुष्य उतरणीला लागल्यावर काकांकडे येणारा कवी एकटाच असतो. एकेकाळी माणसांच्या गर्दीने वेढेलेले काका नंतर ऐकाकी होतात. तेव्हा कवीच त्यांचा आधार असतो. म्हणून मरताना ते कवीचे नाव घेतात.

हा कवी वाचकाच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करतो. कधीच व्यवहारी पातळीवर न येणारा कवीच खऱ्या अर्थाने व्यवहारी जगत असतो. हे कसे ? कवीला काकांशी फक्त चर्चा करणे महत्त्वाचे वाटले,असे का ? असे विविध प्रश्न पाध्ये या व्यक्तिरेखेतून निर्माण करतात. त्यामुळे ही व्यक्तिरेखा अधिक कलात्मक होते. त्या बरोबरच कथेला यश प्राप्त करून देते.

सारांश:

पाध्ये कलावन्तांच्या विविध व्यक्तिरेखा आपल्या कथेतून निर्माण करत असताना तपशीलांना अधिक महत्त्व देतात. कलावन्त जगतो कसे ? याचे तपशील ते प्रत्येक कथेत विखरून टाकतात. त्यामुळे त्यांच्या हया साऱ्याच व्यक्तिरेखा, वास्तव होतात.

पाध्यांनी रेखाटलेल्या या साऱ्याच कलावन्तांची व्यक्तिचित्रे विविध घटनांच्या आधारे ते जीवंत करतात. हा जीवंतपणा नैसर्गिक आहे. त्यामुळे या व्यक्तिरेखा सर्वस्वी मराठी कथेत नव्या आणि वेगळ्या वाटतात.

## राजकीय गुंड आणि कामगार यांच्या व्यक्तिरेखा:

पाध्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा ह्या एकसुरी नाहीत. मानवी स्वभावातील विविध वृत्ती-प्रवृत्ती त्यांच्या कथेत चित्रित झालेल्या दिसतात.

पाध्ये आपल्या कथांमधून विविध मानवी वृत्ती-प्रवृत्ती व्यक्तिरेखां-च्या माध्यमातून जीवन्त करु शकले याला कारण त्यांच्या कथेतील चित्राण क्षेत्राचे वैविध्य.

त्यांच्या कथेत मुंबईतील विविध विश्वांचे चित्राण येते. त्यांची कथा सामान्यांपासून, उच्चवर्गापर्यंत तर कलावन्तांपासून राजकीय गुंडापर्यंत सर्वांनाच आपल्यात सामावून घेते. ही सर्वसमावेशकता पाध्यांच्या व्यापक अनुभवांमुळे आलेली आहे.

यामुळे पाध्ये आपल्या कथेत एखाद्या कलावंताची दमदार व्यक्तिरेखा जशी रेखाटतात तशीच एखाद्या राजकीय गुंडाची, कामगाराची व्यक्तिरेखा-ही समर्थपणे उभी करतात.

याची साक्ष आपल्याला "एक सुन्हेरा ख्वाब" या कथेतील "बंडया" ही व्यक्तिरेखा देते. बंडया एक साधा कामगार. पण त्याचं सारं आयुष्यच मारामाऱ्या, युनियनच्या भानगडी यांनी वेढलेलं. हा बंड्या युनियनच्या भानगडीत बोरसे या दुसऱ्या ~~य इुस-य~~ युनियनच्या पुढाऱ्याचा खून करतो आणि तुरुंगात जातो.

तुरुंग त्याला अपरिचित नाही. मुंबईतल्या प्रत्येक कोठडीची त्याला इत्थंभूत माहिती आहे. कारण त्यानं एका-दुसरी रात्रा तिथं काढलेली आहे. तुरुंगात कोणाला कसं आपलंस करायचं याची तंत्रो त्याला ठाऊक आहेत.

त्यात तो वाकबगार आहे. त्याला आपण तुरुंगात आलो याचे वाईट वाटत नाही. हा इतका निढावलेला गुंड पाध्ये आपल्या वर्णनशैलीला पणाला लावून उभा करतात.

पण गुंड हा ही एक माणूस असतो. याचे भानही ते राखतात. हा बंडया अक्काच्या आठवणीने दसदसा रडतो. तवाएफ गुलाबच्या आठवणीने व्याकुळ होतो. अनिल हा मुलगा आणिबाणी विरोधात उभा टाकलेला पाहून त्यालाही मदत करण्याचा विचार करतो. हे सारे तपशील पाध्यांनी देऊन बंडया हया व्यक्तिरेखेला अधिक कलात्मकपण आणलेलं आहे.

पाध्यांचे व्यक्तिरेखा चित्रित करण्याचे कौशल्य अन्य कथाकारांपेक्षा वेगळे आहे याची साक्ष आपल्याला "बंडया" सारख्या व्यक्तिरेखेतून मिळते. बंडया घटनाक्रमातून गुंड म्हणून वाचकासमोर येतो पण याच घटना पुढे सरकू लागल्या की बंडयातील चांगुलपण, माणूसपण वाचकाला अस्वस्थ करून जाते. शेवटी आणिबाणीविरूद्ध उठणारा बंडया "गुंड"च आहे का ? असा प्रश्न वाचकाला अस्वस्थ करून टाकतो. पाध्यांची "एक सुन्हेरा ख्वाब" ही कथा त्यामुळेच कलात्मक उंची गाठते.

"फाईव्ह गार्डन" कथेतील कोरे साहेब हा ही कामगारांचा पुढारी. पण आपल्या हाताखालच्या आबा ढुकळच्या आयुष्याची शुद्ध विल्हेवाट तो लावतो. त्याच्या बायकोला वापरतो. यात त्याला आपण काही वाईट केलं असं त्याला वाटत नाही. उलट आबाच आपल्या बायकोला परपुरूषाशी संग करायला लावून वेश्येच्या पातळीवर नेऊन ठेवतो. कोणावर तरी प्रेम करावे या स्वाभाविक उर्मीतून ती एक जवानाशी जीव लावते तेव्हा हाच कोरे साहेब तिला दुसऱ्याबरोबर झोपण्याविरूद्ध लेक्चर देत असतो.
हाच कोरेसाहेब माईला लोणावळयाच्या बंगल्यात घेऊन जातो. तेव्हा अचानक त्याची बायको तिथं येते. तेव्हा कोरेसाहेब माईला हाकलवून घालतो. तिला मंगळसुत्र विकून घरी यावं लागतं. माई ढुकळ या पुढाऱ्यांबाबत

बोलता बोलता म्हणते - "ज्यांना स्वत:च्या अंगाची स्वच्छता करता येत नाही, ते म्हणे देशाची स्वच्छता करायला निघालेत."[१४] तिचा हा सारा राग कोरेसाहेबाच्या वर्तनातून निर्माण झालेला आहे.
पाध्ये फक्त प्रसंगांच्या साखळीतून एखादी व्यक्तिरेखा कशी गडद करतात, कलात्मक करतात याचे प्रत्यंतर आपल्याला या ठिकाणी येते. कथेच्या घटनाविकासासाठी वापरलेले प्रसंगच व्यक्तिरेखेची वैशिष्टये उभा करतात. हे वेगळे कौशल्य पाध्ये आपल्या व्यक्तिचित्रणात वापरतात.
पोल्ट्री फार्मिंग मधील अंबादास, बाबू अवदारे,(बायका खाणारी माणसे) या व्यक्तिरेखा पाध्यांनी अशाच ताकदीने उभ्या केलेल्या आहेत.

सारांश:

पाध्यांच्या कथेत राजकीय गुंड, कामगार यांच्या व्यक्तिरेखा सजीवतेने आलेल्या दिसतात. याला कारण पाध्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती व घटनांच्या साह्याने व्यक्तिरेखा जीवंत करण्याचे कौशल्य हे होय. पाध्यांनी उभा केलेली प्रत्येक व्यक्तिरेखा वास्तव वाटते याला कारण पाध्ये माणूस समजावून घेतात व त्यांच्या सर्व वृत्ती-प्रवृत्तीसह कथेत उभा करतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखा ह्या मानवी पातळीवर वावरताना दिसतात. त्या दीर्घकाळ वाचकांच्या स्मरणात रहातात. हेच त्यांच्या व्यक्तिचित्रणाचे महत्त्वाचे यश आहे.

पाध्यांच्या व्यक्तिचित्रणातील बारकावे:

आतापर्यंतच्या विवेचनात पाध्ये यांच्या व्यक्तिचित्रणातील विविधता व वैशिष्ठ्ये यांचा विचार केला. या ठिकाणी एक गोष्ट महत्त्वाची, लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे पाध्ये ढोबळ स्वरूपाचे व्यक्तिचित्रण करीत नाहीत. ते पात्रांच्या स्वभावातील गुंतागुंत व बारकावे अत्यंत चांगल्या पध्दतीने चित्रित करतात. हे त्यांच्या लेखनधर्माचे महत्त्वाचे वैशिष्ठ्य आहे. येथे या त्यांच्या वैशिष्ठ्यांचा सविस्तर विचार करु.

पाध्यांची कथा अनेकदा या बारकाव्यांचे व मानवी स्वभावातील गुंतागुंतीचे चित्रण करून आशयाला गडदपण प्राप्त करून देते. उदा. "फाईव्ह गार्डन" कथेतील माई टुकरूळ आपल्या नव-याचा शेवटी गळा दाबते. ही घटनाफक्त तिच्या स्वभावातील व मानसिकतेतील बारकावे चित्रित करून परिणामकारक करतात. माई टुकरूळला तिचा नवरा म्हातारपणी ही कुंकवाचा धनी, आधार म्हणून हवा आहे. त्याने तिला परपुरूषाशी संबंध ठेवायला भाग पाडले तरी त्याचा राग नाही पण ज्या जवानाशी अत्यंत जीवा-भावाने माईने जीव लावलेला असतो त्याला मारायला लावण्याचे काम आबा टुकरूळने स्वत: केले आहे अशी जेव्हा तो कबुली देतो तेव्हा तिचा संताप अनावर होतो. त्या जवानाशी संग हा तिच्या जीवनातील सुखाचा धागा असतो. त्याला मार खावा लागला हे तिला सहन झालेले नसते. पण या सा-या पाठीमागे आपला नवराच आहे हे कळल्यानंतर मात्र तिचा नव-याविषयीचा संताप, तिरस्कार शिगेला पोहचतो. याची परिणती म्हणून ती त्याचा गळा दाबते. पाध्यांनी या कथेत माई टुकरूळच्या स्वभावातील हे बारकावे चित्रित केले नसते तर ती घटना बटबटीत झाली असती. पण पाध्ये तसे होऊ देत

नाहीत. फक्त स्वभाव चित्रणातील बारकावे चित्रित करून कथेची उंची वाढवतात.

"नवरा" कथेतील "काकू" आपला पती नामर्द आहे हे वास्तव स्वीकारून नरेंद्र, रमाकान्तदादा यांच्याशी संबंध ठेवते. याची तिला बोचणी आहे. पण वास्तवातून ती मार्ग काढण्याचा प्रयत्न करत असते. याचाच एक भाग म्हणून ती लहानग्या दिपूला "नवरा" म्हणत असते. पण हा लहानगा दिपूच जेव्हा तिच्याशी शारीरिक चाळा करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ती ढसढसा रडते. तिच्या एकूण जगण्यातील असाहयता त्यातून प्रकट करते.
या कथेतील बारकावे पाध्ये अत्यंतकुशलतेने रंगवतात. त्यामुळे या कथेचे यश दुणावते.

व्यक्तिस्वभावातील अनेक पदर पाध्ये सहज पकडतात व बारकाव्यानिशी चित्रित करतात याचे चांगले उदाहरण म्हणजे त्यांची "कुटुंब" ही कथा होय. या कथेतील निवेदक आपल्या मुलाला, मुलीला पूर्ण स्वातंत्र्य देऊन वाढवतो. पण नीता या त्याच्या मुलीनं परंपरा स्वीकारून गोस्वामी या पुरूषाची गुलामी स्वीकारून स्वातंत्र्य गमवावे हे त्याला आवडत नाही. तर नीताला स्वातंत्र्यात वाढत असताना स्वातंत्र्याचा अर्थच कळत नाही. मात्र एकदा चुक करून बसलेल्या आपल्या मुलीने गर्भपात करून घ्यावा हे निवेदक - मी-ला मान्य नाही. या साऱ्या चित्रणातून पाध्ये मानवी स्वभावातील अनेक बारकावे यथार्थपणे चित्रित करतात. कथेतील आशयाला गडदपणा प्राप्त करून देतात.
अशाच प्रकारे ते "थालीपीठ" कथेतील नीना सरकटे या खोटया प्रतिष्ठित मुलीची भावनिक कोंडमारा करून घेण्याची खोटी धडपड ही तपशीलासह

चित्रित करतात. या कथेतील मधू जेव्हा चहाच्या कपाला काही शोधू लागतो व तिला उत्तर म्हणून पॅपिलॉनच्या अंगठ्याची गोष्ट तिची तिच्यावरच परतवतो तेव्हा मानवी स्वभावातील अनेक गुंतागुंती वाचकांसमोर येतात. कथेला कलात्मकता प्राप्त व्हायला कारण ही स्वभावातील गुंतागुंत आहे.

असे बारकावे पाध्यांच्या प्रत्येक कथेतून आपल्याला कमीअधिक प्रमाणात सापडतात. त्यामुळेच त्यांची कथा अधिक यशस्वी व कलात्मक होते. त्यामुळे व्यक्तिचित्रणातील बारकावे हे पाध्ये यांच्या कथेचे वाङ्मयीन मूल्य ठरते.

...

सारांश:
======

या प्रकरणामध्ये भाऊ पाध्ये यांच्या काही ठळक व्यक्तिरेखांचा परामर्श घेऊन त्यांच्या व्यक्तिचित्रणाची वैशिष्टये शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मुळात पाध्ये यांच्या कथेत येणाऱ्या व्यक्तिरेखा ह्या रूढ मराठी कथांतून येणाऱ्या व्यक्तिरेखांपेक्षा वेगळया वाटतात. त्यामुळे पाध्यांच्या व्यक्तिरेखांचा विचार गटागटाने केलेला आहे.

पाध्यांच्याक कथांतून चित्रित केल्या गेलेल्या व्यक्तिरेखात मुक्तपणे वावरणाऱ्या स्त्रियांचा एक गट दिसतो. या व्यक्तिरेखा पाध्ये यांचा स्त्री-पुरूष संबंधाकडे पहाण्याचा दृष्टिकोण निर्मळ असल्याचा प्रत्यय देतात. वसुंधरा (वसुंधरा) रिसबुड, अनुसयाबाई (ठेच) सुहासिनीबाई (थिएटर) या स्त्रिया उच्च वर्गातील आहेत. त्यांचा जीवन व्यवहार पाध्ये तपशीलासह चित्रित करून या व्यक्तिरेखा लक्षणीय करतात. या व्यक्तिरेखांचे भावविश्व त्या कथांच्या आशयद्रव्याला व्यापून जाते.

पाध्ये मानवी जीवनाकडे व्यापक सहानुभावाने पहातात. त्यामुळे स्त्रीचे परंपरागत वस्तूमूल्य त्यांना अमान्य आहे. त्यामुळे स्त्रियांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे ते यथार्थपणे चित्रण करतात. स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या अन्यायाचे दर्शन घडवणाऱ्या सुनंदा (पोल्ट्री फार्मिंग), माई टुकरूळ (फाईव्ह गार्डन), भामा (बायका खाणारी माणसे), या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा ते समर्थपणे उभ्या करतात. या ठिकाणी अन्याय निर्मूलन, पक्षाकाराची भूमिका न घेता फक्त स्त्रीला हे भोगावे लागते याचे दर्शन घडवणाऱ्या वास्तव व्यक्तिरेखा निर्माण करतात.

पाध्यांच्या कथातून येणाऱ्या स्त्रिया विविध थरातील आहेत. तशाच विविध मानसिक स्वभावाच्या आहेत. काहींचे स्वभाव परिस्थिती कसे घडवत असते याची साक्ष त्यांच्या अन्याची आई (अक्करमाशा), काकू (नवरा), मैमुना (पडदा) या व्यक्तिरेखा देतात. व्यक्तिच्या भावविश्वाच्या तळ गाठण्याचे पाध्यांचे सामर्थ्य यातून प्रतीत होते.

स्त्री स्वभाव हा किती गुंतागुंतीचा असतो. किंवा एकूण मानवी स्वभावच कसा गुंतागुंतीचा आहे याचे प्रत्यंतर पाध्ये "सुधाकाकू" या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून देतात. आपले दोष उघडे पडू लागले की माणसे धर्माचे भांडवल करण्याचा प्रयत्न कसा करतात याचे चांगले उदाहरण म्हणजे ही कथा होय.

पाध्ये पुरुषांच्या स्वभावाचे, मानसिक वर्तनाचे विविध नमुने आपल्या कथातून ठेवतात, स्त्री-पुरुष संबंधाकडे मोकळे पणाने पहाणारे व नैसर्गिक व्यवहार म्हणून लैंगिक व्यवहार जगणारे पुरुष त्यांच्या कथेत चित्रित केलेले आहेत. तसेच "कुटुंब" कथेतील निवेदक - मी - सारखे स्वत:च्या कल्पनांनी जगणारे पुरुष ही ते योग्य तपशीलांसह चित्रित करतात.

~~पुरुषांच्या व्यक्तिरेखा~~ विकृती बळावलेल्या पुरुषांच्या व्यक्तिरेखा ते "मुरगी" फाईव्ह गार्डन" या कथांतून चित्रित करतात. केरु गाबल्याच्या जीवनाचा ओंगळपणा पाध्ये फक्त शब्दातून जीवंत करतात. येथे त्यांच्या चित्रमय शैलीचा प्रत्यय येतो.

पाध्ये यांच्या व्यक्तिरेखा विविध थरातील व विविध स्वभावाच्या असतात. कलावंतांच्या व्यक्तिरेखा पाध्ये अत्यंत परिणामकारक चित्रित करतात. "गजा मारुळकर (सांड) भास्कर तिळवे (बेसूरा), मधू (थालीपीठ) या कलावंताच्या जीवनातील बारकावे, त्यांच्या वर्तनाचे तपशील, त्या

पाठीमागचे वातावरण या सर्वांच्या प्रत्ययकारी वर्णनामुळे या व्यक्तिरेखा जिवंत वाटतात.

पाध्यांच्या "स्व. देशभक्त काका" एक सुन्हेरा ख्वाब", "देश पुढे गेला" यातून राजकीय गुंड, कामगार व राजकारणी यांच्या व्यक्तिरेखा चित्रित केलेल्या दिसतात. पाध्यांना या जीवनाकडे ही अत्यंत बारकाईने पहाण्याची निकड भासले. त्यामुळे "बंड्या" सारखी व्यक्तिरेखा ते अजोड्पणे चित्रित करतात.

एकूणच पाध्ये यांचा व्यक्तिचित्रणाचा आवाका मोठा आहे. श्रीमंत, कलासक्त, नाटककार, गुंड, राजकारणी, गुन्हेगार, वेश्या, सामान्य स्त्रिया, मुक्तस्त्रिया अशा अनेक प्रकारचा, विविध स्वभावाच्या व्यक्तिरेखा ते त्यांच्या स्वभावातील गुंतागुंतीसह चित्रित करतात. त्यामुळे त्यांची कोणतीच व्यक्तिरेखा बटबटीत अथवा कृत्रिम वाटत नाही.
या सर्व विवेचनानंतर व्यक्तिचित्रणातील खालील वैशिष्टये ध्यानात येतात.

पाध्ये जीवनातील विविध थरातील जीवनविश्वे जशी आशयासाठी निवडतात तसेच व्यक्तिचित्रणासाठीही वैविध्यपूर्ण व्यक्ती-रेखा निवडतात. या व्यक्तिरेखा वास्तवपूर्ण व जीवंत अशा रेखाटण्यात पाध्ये यशस्वी होतात. कारण त्यांना मानवी जीवनाबाबत कमालीची आस्था आहे. त्यामुळे मानवी स्वभाव ही ते आस्थापूर्वक समजून घेतात व चित्रित करतात.
त्यांच्या व्यक्तिरेखा विलक्षण परिणामकारक होतात. याला कारण प्रसंग, घटना व तपशील यांचा पाध्ये व्यक्तिचित्रणासाठी समर्पक वापर करतात. कधीकधी फक्त प्रसंगातून तर कधी कधी फक्त तपशीलातून ते प्रत्ययकारी व्यक्तिरेखा चित्रित करतात.
पाध्यांच्या कथेचा आशय आणि व्यक्तिरेखा ह्या वेगवेगळ्या काढता येत नाहीत. इतक्या त्या एकरूप, एकसंघ चित्रित केलेल्या असतात. कधी

कधी संपूर्ण आशयच या व्यक्तिरेखा पेलतात. त्यामुळे त्यांच्या कथेत त्यांना महत्त्वाचे स्थान उरते.

पाध्यांच्या जीवन-चिंतनाचा आवाकाही विशाल आहे. त्यामुळे स्वकल्पनाधिष्ठित जीवन जगणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या व्यक्तिरेखा ते परिणामकारकरित्या चित्रित करु शकले. त्यांच्या लेखन भूमिका सहजपणे पेलणाऱ्या अकृत्रिम व्यक्तिरेखा निर्माण करण्यात पाध्ये यामुळेच यशस्वी होतात.
कथेतील स्थिर पात्रे व विकसनशील पात्रे अशा कृत्रिम वर्गीकरणाची त्यांना गरज भासत नाही. सर्वच व्यक्तिरेखा कमी अधिक प्रमाणात विकसनशील ठेवण्यात पाध्ये कमालीचे यशस्वी होतात.

व्यक्तिरेखा निर्मितीच्या वेळी पाध्ये पक्षपाती भूमिका घेत नाहीत. त्यामुळे त्यांनी सर्वच व्यक्तिरेखा तटस्थपणे निर्माण केल्या. त्या अकृत्रिम व्यक्तिरेखा वाटतात. त्या नैसर्गिक व सहजसुलभ वास्तव वाटतात. त्यांच्या व्यक्तिचित्रणाला त्यामुळे वेगळे परिणाम प्राप्त होते.

पाध्ये वास्तवातून आशयद्रव्य निवडतात. तसेच व्यक्तीचित्रणाबाबत-ही वास्तवाचा आधार सबळपणे घेतात. त्यामुळे त्या सर्व व्यक्तिरेखा जीवंत व हाडामसाच्या वाटाव्यात इतक्या सजीव होतात. हे यश एखाद्याच कथाकाराला लाभते.

मराठी कथेत पाध्यांइतक्या वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखा निर्माण करणारा कथाकार विरळच म्हणावा लागेल. कारण अशा वैविध्यपूर्ण, जीवंत व्यक्ति-रेखा मराठीकथेत क्वचितच सापडतात.

.....

प्रकरण तिसरे
==========

संदर्भ
======

१) पाध्ये भाऊ : "अक्करमाशा" एक सुन्हेरा ख्वाब, धारा प्रकाशन, औरंगाबाद, १९८०, पृ. १०१.

२) पाध्ये भाउ : "नवरा" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन,नौपाडा, १९८४, पृ. ९८.

३) पाध्ये भाऊ : "अनु/भव", थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, नौपाडा, १९८४, पृ. ७९.

४) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ९९

५) पाध्ये भाऊ : "कुटुंब" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, नौपाडा, १९८४, पृ. १७.

६) पाध्ये भाउ : तत्रैव, पृ. २७.

७) पाध्ये भाउ : "वसुंधरा" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, नौपाड, १९८१, पृ. ७८.

८) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ८१.

९) पाध्ये भाउ : तत्रैव, पृ. ८१.

१०) पाध्ये भाऊ : तत्रैव, पृ. ८५.

११) पाध्ये भाऊ : "मुरगी", मुरगी, डिंपल पब्लिकेशन, नौपाडा, १९८१, पृ. ८.

१२) पाध्ये भाऊ : "सांड" मुरगी, डिंपल पब्लिकेशन, नौपाडा, १९८१, पृ. ६१.

१३) पाध्ये भाऊ : "थालीपीठ", थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, नौपाडा, १९८४, पृ. १४४.

१४) पाध्ये भाऊ : "फाईव्ह गार्डन" थालीपीठ, डिंपल पब्लिकेशन, नौपाडा, १९८४, पृ. १४.

........